<u>आमदार स्थानिक विकास कार्यक्रम</u>
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी लेखाशीर्ष ४५१५ ००१२ अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीचे विधानमंडळ सदस्यनिहाय निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन ज्ञापन क्रमांक- स्थाविका-०४१८/प्र.क्र.५६ /का-१४८२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -१४ मे, २०१८.

<u>वाचा:</u>- १) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक- स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२.७.२०१६
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक २.४.२०१८
३) नियोजन विभाग, ज्ञापन क्रमांक- स्थाविका-०४१८/प्र.क्र.५६/का.१४८२, दिनांक २५.४.२०१८

ज्ञापन :-

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विज्ञप्तिपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, महाराष्ट्र विधानमंडळाने, “महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८” मंजूर केले असून ते महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या अधिसंमतीनुसार महाराष्ट्र अधिनियम क्र. २२ म्हणून, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक २७ मार्च, २०१८ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षांमध्ये एकूण **₹७३४,००,००,०००/- (अक्षरी रुपये सातशे चौतीस कोटी फक्त)** इतका नियतव्यय मंजूर असून तो संपूर्ण अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अर्थसंकल्पित केलेल्या निधीच्या १००% निधी वितरीत करण्यास मंजुरी दिली आहे.

२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२.७.२०१६ मधील परिच्छेद २.१ येथील तरतूदीनुसार राज्यातील २८८ विधानसभा सदस्यांना तसेच ७८ विधान परिषद सदस्यांपैकी सन २०१८-१९ या वर्षामध्ये निवृत्त होणारे २१ सदस्य वगळता उर्वरित ५७ विधानपरिषद सदस्यांना देखील सन २०१८-१९ या पूर्ण आर्थिक वर्षाकरीता प्रति सदस्य रु. २.०० कोटी याप्रमाणे एकूण <u>₹ ६९०.०० कोटी (रुपये सहाशे नव्वद कोटी फक्त)</u> एवढा निधी यापूर्वीच वितरीत करण्यात आला आहे. शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२/७/२०१६ मधील परिच्छेद ४.३ मध्ये सुधारणा करुन पुनर्निवडणुक अथवा निवृत्ती इ. कारणामुळे विधीमंडळ सदस्यांचा कालावधी आर्थिक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच संपुष्टात आल्यास त्या आर्थिक वर्षातील सदस्यांचा कार्यकाल विचारात घेऊन दरमहा ₹ १६.६६ लक्ष याप्रमाणे निधी वितरीत करण्यास मा. मंत्री (नियोजन) यांनी तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१८-१९ या वर्षात निवृत्त होणाऱ्या विधानपरिषद सदस्यांना त्यांचा आर्थिक वर्षातील कालावधी विचारात घेऊन सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे दरमाह ₹ १६.६६ लक्ष याप्रमाणे <u>एकुण ₹ १२१६.१८ लक्ष (रुपये बारा कोटी सोळा लक्ष अठरा हजार फक्त)</u> एवढा निधी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे.

३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२ जुलै, २०१६ च्या तरतुदींच्या अधीन राहून या निधीचे पुढील वितरण तात्काळ करावे.

४. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२ जुलै, २०१६ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांत बसणारी कामे जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर करावीत. सदर निधीचा विनियोग करतांना वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/ अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकातील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे. तसेच विविध स्तरावरील सार्वत्रिक निवडणुकांच्या आचारसंहितेचा कालावधी तसेच केंद्र व राज्य निवडणुक आयोगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीचा विनियोग करावा. वितरीत केलेल्या निधीचा विनियोग पूर्णपणे होईल याची जिल्हाधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. तसेच या निधीमधून झालेल्या खर्चाचा ताळमेळ घेण्याची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करावी.

५. हे ज्ञापन शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८ / प्र.क्र. ६९ / अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०५१४१७३९१८३६१६ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2018.05.15 11:33:27 +05'30'

(अ. द. जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- विवरणपत्र.

प्रति,

१ मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
२ मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
३ महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
४ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
५ जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, नाशिक,पुणे, बीड, परभणी, लातूर, अमरावती, यवतमाळ व चंद्रपूर
६ सर्व उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
७ जिल्हा नियोजन अधिकारी, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, नाशिक,पुणे, बीड, परभणी, लातूर, अमरावती, यवतमाळ व चंद्रपूर
८ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९ जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, नाशिक,पुणे, बीड, परभणी, लातूर, अमरावती, यवतमाळ व चंद्रपूर
१० वित्त विभाग (कार्यासन अर्थ-१५/व्यय-८),
११ नियोजन विभाग, अर्थसंकल्प कक्ष (का.१४२४),
१२ ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी, नियोजन विभाग,
१३ निवड नस्ती-का/१४८२, नियोजन विभाग,

शासन ज्ञापन क्र. स्थाविका-०४१८/प्र.क्र.५६/का.१४८२, दिनांक १४ मे, २०१८ चे विवरणपत्र (रु. लाखांत)

नोडल जिल्हा	अ.क्र.	वि.प.स. चे नाव	कार्यकाल समाप्तीचा दिनांक	अनुज्ञेय निधी	वितरित निधी
मुंबई उपनगर	१	ॲड. अनिल परब	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
	२	डॉ. दीपक सावंत	०७.०७.२०१८	४९.९८	४९.९८
	३	श्री. कपिल पाटील	०७.०७.२०१८	४९.९८	४९.९८
	४	श्री. विजय (भाई)गिरकर	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
		वि.प.स एकूण (४)		**२३३.२४**	**२३३.२४**
ठाणे	५	श्री. निरंजन डावखरे	०७.०७.२०१८	४९.९८	४९.९८
	६	श्री. संजय दत्त	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
		वि.प.स एकूण (२)		**११६.६२**	**११६.६२**
रायगड	७	श्री. जयंत पाटील	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
	८	श्री. अनिल तटकरे	३१.०५.२०१८	३३.३२	३३.३२
	९	श्री. सुनिल तटकरे	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
		वि.प.स एकूण (३)		**१६६.६**	**१६६.६**
नाशिक	१०	श्री. जयवंतराव जाधव	२१.०६.२०१८	४९.९८	४९.९८
	११	श्री. अपुर्व प्रशांत हिरे	०७.०७.२०१८	४९.९८	४९.९८
		वि.प.स. एकूण (२)		**९९.९६**	**९९.९६**
पुणे	१२	श्री. जयदेव गायकवाड	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
	१३	श्री. शरद रणपिसे	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
		वि.प.स एकूण (२)		**१३३.२८**	**१३३.२८**
बीड	१४	श्री. नरेंद्र पाटील	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
	१५	श्री. महादेव जानकर	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
	१६	श्री.अमरसिंह पंडित	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
		वि.प.स एकूण (३)		**१९९.९२**	**१९९.९२**
परभणी	१७	अब्दुल्ला खा.बाबाजानी	२१.०६.२०१८	४९.९८	४९.९८
		वि.प.स एकूण (१)		**४९.९८**	**४९.९८**
लातूर	१८	श्री.दिलीपराव देशमुख	२१.०६.२०१८	४९.९८	४९.९८
		वि.प.स एकूण (१)		**४९.९८**	**४९.९८**
अमरावती	१९	श्री.प्रविण रामचंद्र पोटे	२१.०६.२०१८	४९.९८	४९.९८
		वि.प.स एकूण(१)		**४९.९८**	**४९.९८**
यवतमाळ	२०	श्री.माणिकराव ठाकरे	२७.०७.२०१८	६६.६४	६६.६४
		वि.प.स एकूण(१)		**६६.६४**	**६६.६४**
चंद्रपूर	२१	श्री. मितेश भांगडिया	२१.०६.२०१८	४९.९८	४९.९८
		वि.प.स एकूण (१)		**४९.९८**	**४९.९८**
		एकूण वि.प.स. २१		**१२१६.१८**	**१२१६.१८**

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2018.05.15 11:34:20 +05'30'

(अ.द. जोशी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन